# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक : एमआयएस-०६१५/सीआर-०३/२०२१/तीन दिनांक : २७ जानेवारी, २०२१

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय** :- अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

अनाथ मुलांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अन्वये शिक्षण व नोकरी यामध्ये अराखीव (खुला) पदांमधून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

२. अनाथ मुलांकरीता लागू करण्यात आलेल्या आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र. १८२/का-०३, दिनांक २० ऑगस्ट, २०१९ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनाथ आरक्षणांतर्गत पदभरतीसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्याकडून अनाथ प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे तसेच सदर प्रमाणपत्राचा संकेतांक व दिनांक अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जाहिरातीकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचे, विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांनी प्रदान केलेले अनाथ प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. तसेच आयोगाच्या सर्वसाधारण सूचनांमधील तरतुदीनुसार एखाद्या जाहिरातीस अनुसरून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्राणालीद्वारे अर्ज सादर करताना अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांनी आयोगाच्या सूचनेनुसार कोणत्याही टप्प्यावर आवश्यक पुरावा/ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. आयोगामार्फत सन २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांना त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या अनाथ प्रमाणपत्राची प्रत सादर करणे अनिवार्य आहे:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | १९/२०१९ | राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२० | १३ जानेवारी, २०२० |
| (२) | ०५/२०२० | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२० | १९ मार्च, २०२० |
| (३) | ०६/२०२० | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा – २०२० | ०७ एप्रिल, २०२० |

३. आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या उपरोक्त जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(१) उपरोक्त परीक्षांकरीता आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्याकडून प्राप्त अनाथ प्रमाणपत्राची स्कॅन प्रत पुरावा म्हणून सादर करावी.

(२) वैध अनाथ प्रमाणपत्राचा दिनांक संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा असणे अनिवार्य आहे. अनाथ प्रमाणपत्र संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकापूर्वीचे नसल्यास संबंधित उमेदवाराचा अनाथ आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल व अशा पद्धतीने रद्द केलेला दावा नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतला जाणार नाही.

(३) वैध अनाथ प्रमाणपत्र प्रत आयोगास पाठविताना त्यावर उमेदवाराने स्वत:चे नाव, परीक्षेचे नाव, अर्ज नोंदणी क्रमांक नमूद करून प्रथम स्वसाक्षांकित करावे व त्यानंतर प्रमाणपत्र स्कॅन करणे आवश्यक आहे.

(४) अनाथ आरक्षणासाठी अर्जाद्वारे दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्यापृष्ठ्यर्थ वरीलप्रमाणे वैध पुरावा सादर न केल्यास अथवा आयोगाकडे सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिकाऱ्याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास अशी कृती आयोगाची फसवणूक करणारी समजण्यात येऊन आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा व निवडींपासून उमेदवारास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित करण्यात येईल तसेच अशा उमेदवारांविरुद्ध संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई सुद्धा करण्यात येईल.

४. वरीलप्रमाणे संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची वैध अनाथ प्रमाणपत्राची स्कॅन प्रत pre-examination@mpsc.gov.in या इमेल आयडीवर **दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१** पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर प्राप्त विनंतीचा विचार करण्यात येणार नाही.

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई